

# शाळेतील गुलाबी दिवस

रशिद मज्जीद इनामदार

# शाळेतील गुलाबी दिवस

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# शाळेतील गुलाबी दिवस

(कथा)

लेखक :

रशिद इनामदार

**शाळेतील गुलाबी दिवस**

**रशिद इनामदार**

**सकाळ ,मानखुर्द बातमीदार**

213,सी वार्ॅड, मोहीते पाटील नगर,

वीरमाता जीजाबाई भोसले मार्ग

मानखुर्द मुंबई 400 043

संपर्क क्रमांक 9222517143

ब्लॉग: tumchachrashid@blogspot.com

Email: Rashidinamdar247@gmail.com

Facebook: तुमचाच रशिद

**दूरध्वनी क्रमांक : ९२२२५१७१४३ / ९८६९७८६३७२ /९७०२२०३३५५**

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks

**प्रकाशन : २ ऑक्टोबर २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# शाळेतील गुलाबी दिवस

## रशिद इनामदार

ई-साहित्य प्रतिष्ठान

पहिली आवृत्ती
ऑक्टोबर २०१८
(c)२०१८, रशिद इनामदार

मुखपृष्ठ
सामिया रशिद इनामदार / नितीन गोरे (नमः सोफटेक)

प्रकाशक
इ-साहित्य प्रतिष्ठान

रशिद इनामदार

वार्ताहर

दूरध्वनी क्रमांक : ९२२२५१७१४३ / ९८६९७८६३७२ /९७०२२०३३५५

शाळेतल्या पहिल्या प्रेमासाठी

या कथेतील सगळी पात्रे (मी सोडून)काल्पनिक आहेत.

त्यांचा कुणाच्याही जीवनाशी काहीही संबंध नाही.

कुठे चुकून संबंध आलाच तर तो निव्वळ योगायोग समजावा.

## प्रस्तावना –प्रफुल्ल फडके (सर)

(हे पेज लवकरच अपडेट होईल)

खूप छान प्रयत्न आहे. तुझे अनुभव, शब्द खूपच जिवंत वाटतात. तुझ्या लेखन कलेला सलाम. असाच लिहित रहा... god bless you...

सौ. आशा सकपाळ (madam)
शाळेतील आमच्या पहिल्या वर्गशिक्षिका,
हिंदी आणि विज्ञान

## मनोगत... शाळेतील गुलाबी दिवस

'राशिद', नव्वदच्या दशकातील शाळेतील दिवसांत माझ्या इयत्ता सहावीच्या वर्गात दाखल झालेला गोंडस गुटगुटीत मुलगा. हुशार, हसरा, लाघवी आणि अतीभवली वागणारा. मी वर्गशिक्षिका, समाजशास्त्र शिकवित असे.

राशिद शाळेच्या हस्तलिखितात लिहू लागला आणि संवेदनशील मनाने बदलत्या परिस्थितीचा टिपू लागला. आज तो पत्रकार व प्रथितयश लेखक म्हणून नावारूपाला येत आहे; याचा मला अभिमान आहे.

राशिदने 'शाळेतील गुलाबी दिवस' ही लेखमालिका लिहिली, तेव्हा तिसरा भाग प्रसिद्ध झाला होता व मी सुरुवातीपासून वाचण्यास लागले. पाचव्या भागापर्यंत त्याच्या निरागस प्रेमभावना कोणाबद्दल आहेत याचा मी अंदाज बांधला. नंतर मला खात्री वाटत गेली. एका भागात त्याने, 'मी त्याला मुख्याध्यापकांसमोर उभे करीन' असे लिहिले तेव्हा त्याला पात्रांच्या हितासाठी नावांची गुप्तता राखण्याबद्दल सुचविले. त्याने लेखांमधून केलेली सूक्ष्म निरीक्षणे अचूक वर्णने कथेस पूरक आहेत.

शाळेतील पहिलं प्रेम लिहिण्याची किती खुळचट व बालिश कल्पना आहे असं मला वाटलं. पण राशिदचे गुलाबी अनुभव, आठवणी व संतोतंत वर्णने वाचून त्याच्या विचारांची उंची जाणवत गेली. प्रत्येकाला आयुष्यात कुठल्यातरी वळणावर पहिलं प्रेम व गुलाबी दिवस अनुभवतं. त्यातील नव्वद टक्के अपयशी ठरतात. कारण वेड्या स्वप्नांची, अपरिपक्व विचारांची दुनिया सत्यात उतरणे अशक्य असते. एखाद्या 'प्रेम' आणि 'प्रियाल्याच' ते जमतं. त्यासाठी जीवनसंघर्ष करावा लागतो. पौगंडावस्थेतील निरागस व काहीसं वेडं प्रेम व्यक्त करणे किंवा प्रांजळपणे कबूल करण्याचे धैर्य राशिदनं दाखवलं याबद्दल कौतुक आहे.

गेल्या तीस वर्षांत आमची शाळा व तिची बदललेली अनेक रूपं आम्ही अनुभवली आहेत. मानखुर्द व संस्थेच्या परिसराची वर्णने इतिहास सांगतात.

रशिदने विद्यार्थ्यांचे हुशार, मध्यम व मागच्या बाकांवरचे असे तयार केलेले संच, त्यांच्या विचार करण्याच्या पद्धती हा संशोधनाचा विषय आहे. मानवी मनाची अवस्था समजून घेण्याची त्याची कुवत चांगली आहे.

लेखातील भावनिक गुंतागुंतीचे चित्र स्पष्ट आल्यामुळे मी रशिदला थांबण्यास सांगितले. अनेकांची सहमती नसेलही. माझ्या मते तेव्हाची परिस्थिती व माणसे बदलली आहेत. कथेतील पात्रे व घटना यांचे अर्थ लावले जाऊन नातेसंबंध बिघडण्याची वेळ येऊ शकते हे समजून घेऊन त्याने कथा मालिका आवरती घेतली, त्याला बदल केले यासाठी धन्यवाद!

रशिद यानंतर तुझी 'रमझान' बद्दलची लेखमालिका अभ्यासपूर्ण माहिती देणारी होती.

मनाची कवाडं उघडी ठेवून मान्य करण्याची तुझी लेखनशैली मला नेहमीच भावते.

तुला व तुझ्या प्रियजनांना उत्तम आयुष्य व भविष्य लाभावे हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

लेखनाची संधी दिल्याबद्दल आभार!

तुझ्या वर्गशिक्षिका श्रीम. तनुजा शेट्ये-काळण
दिनांक २५.०८.२०१८ - नारळीपौर्णिमा

# शाळेतील गुलाबी दिवस



थोडंसं नाजूक आणि थोडं खाजगी आहे. पण कित्येक वर्षे मनात लपवून ठेवलेलं, या पावसामुळे, आणि या वातावरणानं, ओठाशी आणलंच (अवचित मनात 'ओंठो पर ऐसी बात..." हे सुद्धा बॅकग्राउंडला वाजू लागलं). मुळात आपलं आयुष्य सिनेमातील कथेप्रमाणेच असते. कित्येक नाजूक कित्येक हवेहवेसे क्षण आपण डोळयांच्या कॅमेऱ्याने गुपचूप टिपून घेत असतो. ते क्षण हळवे असतात, ते क्षण प्रेमाने गुलाबी झालेले असतात. ते क्षण आश्चर्याचे, आनंदाचे आणि क्वचित दुःखाचे देखील असतात (दुःखाचे क्षण आपण मेमरीतुन काढून टाकण्याचा प्रयत्न करतो पण ते जात नाहीत)

अशा क्षणांची डोळयांनी टिपलेली चित्रे एकांतात आपल्या डोळयासमोर अलगद तरंगू लागतात... झाडांच्या पानांसारखी ही तरंगणारी असंख्य छायाचित्र फक्त आपल्यालाच दिसतात इतरांसाठी ती अदृश्यच असतात. कधी गुलाबाच्या चिंब भिजलेल्या पाकळयांसारखी किंवा मोरपंखांसारखी डोळयांवरुन अलगद हळुवार स्पर्श करून जातात. या आठवणी जर 'ती'च्या विषयी असतील तर सर्व काही अगदी इस्टमन कलर किंवा हाय रेसोलुशन पिक्सेल ची रंगीत गुलाबी छायाचित्रे दिसतात आणि तिचा सहवास हवाहवासा वाटू लागतो. त्यात या पावसात तर तिची उणीव जाणवतेच, वाटते तिला पुन्हा भेटावे पण ते शक्य नसल्यामुळे... तिच्या आठवणीतच समाधान मानावे लागते... आणि तिला मनातल्या मनात विचारावसं वाटतं चंद्रशेखर गोखले सरांच्या शब्दात

“आठवतं तुला आपलं

एका छत्रीतून जाणं

ओघळणारे थेंब आपण

निथळताना पाहणं. ”

थोरा मोठ्यांची, गुरुजनांची क्षमा मागून एक आठवण इथे लिहितोय... म्हणतात ना प्रेमात पडायला कसलेच बंधन नसते. आणि कधी प्रेमात पडलो हे आपलं आपल्यालाच कळत नाही. जेंव्हा पौगंडावस्थेत आपल्याला देखील कोणीतरी आवडू लागते. एक अनामिक भीतीही त्यासोबत मनात दाटू लागते.

सहावी सातवीपासून मलाही कोणीतरी आवडू लागले होते. भीतीमुळे ज्यादिवशी असं काही वाटायचो त्याच्या दुसऱ्या दिवशी मी आवडलेल्या तिला ताई म्हणून स्वतःला सावरून मनाची समजूत घालायचो. खूप जणी त्यामुळे माझ्या बहिणी झाल्या... अखेर अशी वेळ आली कि मन देखील माझ्यावर फितूर झाले... त्याला ही माझे ऐकावेसे वाटेना झाले. वर्गातल्या मुलींपैकी एक ती मला आवडू लागली. मला नव्हतं कळत कसं तिला सांगावं. ती एकांतात भेटावी अशी मनोमन खूप इच्छा असायची, कारण त्याशिवाय तिला विचारता आले नसते. देवही आपलं कधी कधी ऐकतो असं वाटतं. बहुतेक तिला एकांतात भेटण्याची इच्छा देवाने लवकरच पूर्ण केली.

त्यादिवशी सकाळपासून मुसळधार पाऊस पडत होता. कसल्यातरी जादा तासासाठी आम्हाला लवकर बोलावलं होतं. मी सकाळी साडेदहाच्या सुमारास शाळेत पोहोचलो. शाळेत एकदम सामसूम होती. मैदानातून शाळेच्या ऑफिसकडे आलो तर माझ्या डोळ्यावर विश्वासच बसला नाही. ती आणि तिला सोडायला आलेली तिची बहीण तिथे उभ्या होत्या.

मला पाहून त्या दोघी ऑफिस समोरच्च्या व्हरांड्यात गेल्या. तिथे तिला सोडून तिची बहीण निघून गेली. मग आम्ही दोघेच आणि तिसरं कुणीच नाही. मुसळधार पाऊस पडत होता, शाळेशेजारचा नाला भरून वाहत होता... त्यामुळे वातावरणात मस्त गारवा होता... मैदानात हिरवं गवत चिंब भिजत होतं... अणुशक्ती नगरच्या हिरव्या डोंगरावर ढगांची चादर अलगद हळुवार कूस बदलत होती... वातावरण अगदी प्रसन्न आणि आनंदाचं ती आणि मी आणखी कुणीच नाही.

ती आणि मी असं एकांतात भेटणं तसं कठीण आणि अशक्यच होतं म्हणा... पण आलं देवाजीच्या मना आणि त्याने दिली आयतीच संधी एकांतातील सहवासाची... आजवर एकट्यात विचारीन अशी मनाची समजूत घालणारा मी... एकटी भेटल्यावर देखील पार गोंधळून गेलो होतो... नुकतीच शाळा सुरू झाली होती. त्यामुळे नवीन गणवेश, पोपटी रंगाचं नवीन दप्तर,,, तेल लावून मस्त चापून घातलेली वेणी... काळया रिबिनी... माळलेला गजरा... गालावर हलकाच गरज नसताना दिलेला पावडरचा थर ओठांखाली अगदी बारीक पण ठळक तीळ असं रूप मी डोळयात साठवत होतो... वळचणीखाली हात धरून छपरावून येणारं पावसाचं पाणी ती झेलत होती... त्या पाण्याचे थेंब तिच्या गोऱ्या गालांवर उडत होते... केसांची एक इवलीशी बट तिच्या कपाळावर तिच्याचसारखी अल्हड लाडिक चाळे करत होती... ती एकटक पावसाकडे पाहत होती आणि गेटकडून येणाऱ्या पायवाटेकडे देखील... ती पावसाचा स्वच्छंदी मनसोक्त आनंद घेत होती... त्याचबरोबर एखादी मैत्रीण येताना दिसतेय का ते सुद्धा पाहत होती.

तिच्या गालावर पाण्याचा थेंब उडाला आणि ओघळला. थंड लागल्यामुळे ती थोडीशी चमकली आणि स्वतःशीच गोड हसली (स्मितहास्य म्हणतात बहुतेक) तिला माझं तिथं हजर असणं देखील जाणवत नसावं, इतकी ती पावसात आणि स्वतःत गुंतून गेली होती.

माझ्या मनात मात्र कालवा कालव झाली होती. हृदयाची धडधड वाढली होती. काय विचारू आणि कसं विचारू हे सुचत नव्हतं... एकदा वाटलं झटकन जावं आणि पटकन विचारावं. त्यावेळी नुकतेच बॉलिवूड मध्ये आलेले अजय देवगण, शाहरुख, अक्षय, सुनील शेट्टी यांची आठवण पण काढून पाहिली. जॅकी, ऋषी यांचा सरता काळ सुरू होता तरी त्यांची देखील आठवण काढून झाली. कसं विचारावं तेच कळत नव्हतं. बरं विचारलंच आणि ती नाही म्हणाली तर आणि घरी किंवा मॅडमना सांगितलं तर काय होईल? कोणत्या मॅडम कशी शिक्षा देतील. वर्गशिक्षिका मॅडमना कळालं तर त्या मुख्याध्यापक सरांसमोर उभं करतील की पालकांना घेऊन यायला सांगतील.

मुख्याध्यापक सरांनी एकदा त्याच व्हरांड्यात बसून इंग्रजी च्या पुस्तकातला धडा ३ वेळा लिहून काढण्याची शिक्षा दिली होती. त्याआधी मस्ती करतो म्हणून उभं केलं होतं तेंव्हा मी म्हणालो, "सर आता पुन्हा नाही करणार. " तरीही, "दारुड्याने केली प्रतिज्ञा" म्हणत त्यांनी दोन्ही हातावर छड्या दिल्या होत्या, ते आठवलं आणि अंगावर काटाच आला...

तरीही वाटलं विचारूयाच लावून टाकूया एकदाचा सोक्षमोक्ष... शरीरात असलेली शक्ती एकवटून आणि मनातील भीती कशीबशी दाबून ठेवत थोडंसं थरथरत्या ओठाने इतक्या मस्त हिरव्या गार वातावरणात, गारव्यात देखील कपाळावरून आलेला घर्मबिंदु टिपत... कोरड पडलेल्या घशातून जड आवजात हाक मारली, "अगं, ****** "

तसं तिने दचकत माझ्याकडे पाहिलं आणि विचारलं, " काय ?".

थेट नजरेला नजर भिडली आणि सगळं अवसान गळून पडलं.

मी आवंढा गिळत विषयच बदलला, "थोडं बाजूला उभी रहा तुझ्या दप्तरावर पाणी टिपकतंय. " असं म्हणत गप्प झालो.

ती थोडी पाठी सरकली आणि तिने दप्तर तपासलं. मग तिने दप्तर खाली ठेवलं आणि रुमालाने पुसलं. (तेंव्हा ते प्रेमापोटी कौतुकाचं वाटलं पण आजही प्रश्न पडतो भिजलेलं दप्तर रुमालाने पुसण्यात काय बरं लॉजिक... असो). एक प्रयत्न फसला होता. आता पुन्हा पहिल्यापासून सुरुवात मनाची तयारी पुन्हा सगळया देवांना आठवलं. त्यावेळी असं वाटलं पावसात कुठेतरी निर्मनुष्य बंगल्यात हिरो हिरोईन अडकावेत आणि तिथे गाणं सुरू व्हावं. आता डिरेक्टर ऍक्शन म्हणेल. छताच्या उंचीवर असलेला क्रेन वरचा, किंवा आम्हा दोघांना फॉलो करणारा क्लोज, किंवा लक्ष्या आणि वर्षा उसगावकर च्या गाण्यातल्या प्रमाणे ट्रॉलीवरचा कॅमेरा सुरू होईल आणि मी तिला प्रेमाचं विचारीन. त्यानंतर गाणं सुरू होईल(टीप टीप बरसा पाणी..., टीप टीप बारिश सुरू हो गयी... किंवा आज रपट जाये तो हमे ना बुलईयो) आणि ती माझ्यासोबत नाचेल...

मला झटकन जाग आली. वेळ कुणासाठी थांबत नाही... ही संधी गेली तर पुन्हा ही अशी एकांतात भेटणं शक्य नाही... आपल्याला आजच विचारायला हवं म्हणून पुन्हा तिला आवाज दिला. तिने पुन्हा तसंच पाहिलं. तिला विचारणार इतक्यात चन्या आला आणि मी पुन्हा विषय बदलला. (सगळी पोरं त्याला चणा म्हणायची का कुणास ठाऊक... बहुतेक प्रेमानं) माझ्या या प्रेमकथेतला व्हिलन. नको त्यावेळी टपकायची त्याला घाण सवयच होती.

आजपण त्याने त्याचं काम चोख बजावलं होतं. थोडं थांबून आला असता तर काय बिघडलं असतं त्याचं. त्याच्याच चाळीत राहत होती ती. आधी तोही तिच्या पाठी होता. माझं कळल्यावर बाजूला झाला आणि तिला ताई म्हणत मला मेहुण्याच्या हक्काने थोरपणाचे बोल ऐकवू लागला(नापास होऊन आला होता माझ्या

वर्गात म्हणजे थोरच)... दुसऱ्या दिवशी तिचा आणि माझा मित्र झाला आणि तिसऱ्या दिवशी पुन्हा पूर्व पदावर आला. मुळात मला त्याचा अंदाजच येत नव्हता. हा माझी बरोबरी कशी करू शकतो(शाळेत जास्त मार्क मिळवणाऱ्या, बहुतेक प्रश्नांची उत्तरं येणारा, वाचन, वक्तृत्व, निबंध स्पर्धा वगैरे स्पर्धात भाग घेणारा आणि बक्षिसे, प्रमाणपत्र मिळवणाऱ्या तीन-चार मुला-मुलींचा संच असतो. थोडक्यात त्याला राजघराण्याप्रमाणे मान असतो. त्यापैकी मी एक आणि हा विसाच्या पुढे नंबर येणारा असो). त्याच्या एंट्री नंतर सगळंच संपलं होतं आणि दिल के अरमा आसूओ(बारिश के पाणीमे) बह गये... सारखी परिस्थिती झाली. चन्याने मात्र आम्हाला दोघांना एकांतात पाहून त्याच्या सोयीने अर्थ लावून घेतला... पुढे त्याने वर्गात काय पिकवलं असेल याची कल्पना तुम्हाला असेलच... खाया पिया कुछ नही ग्लास भी नही तोडा तो भी बाराना...

चण्याचा अनपेक्षितरित्या (अपेक्षित म्हणायलादेखील काहीच हरकत नाही) झालेला प्रवेश इतका त्रासदायक होता कि विचारू नका... खाऊ कि गिळू असं वाटलं (कबाब मे हड्डी)... मनातल्या मनात किती शिव्याशाप दिले असतील याची कल्पना तुम्हालाही असेलच... कदाचित तीही त्याला शिव्याच घालत होती आणि तिच्या कपाळावरील आठ्या आणि चेहऱ्यावरील गंभीरता यातून जाणवत होते. (चण्याने केलेल्या आगाऊपणामुळे बरं... माझ्यावरील प्रेमापोटी नाही असो) माझ्या मनातील तिच्याबद्दलची भावना तिला सांगण्याची एक चांगली संधी हुकली होती.

ती संधी पुन्हा कधीच आली नाही. त्यानंतर फक्त बघणं आणि मनातील प्रेम मनातच दडपून ठेवणं सुरु झालं. शाळा कादंबरी मध्ये मुकुंद जोशी म्हणतो, "आपल्या लाईनकडं बघणं म्हणजे एक कला असते, लाईनला पण नाय कळलं पाहिजे कि आपण तिच्याकडे बघतोय" हे नंतर वाचनात आलं पण तसंच वागण्याचा प्रयत्न

आपल्यापैकी बरेच जण करत होते. (अर्थात माझ्यासारखं प्रामाणिकपणे कबुल करणारे क्वचितच असतात.) तिच्याकडे बघता यावं म्हणून तिच्या नेमक्या विरुद्ध बाजूला बसण्याची जागा ठरली. त्यामुळे तिला कायम पाहत राहावसं वाटायचं. शाळेत येताना वाट वाकडी करून तिच्या घराजवळ थांबायचं, त्यानंतर तिच्या पाठोपाठ शाळेत यायचं... घरीदेखील तिच्याच आठवणीत मन रमायचं... त्यामुळे लिहायचा गृहपाठ सोडला तर अभ्यासाकडे दुर्लक्षच झालं... प्रगतिपुस्तकातील (अधोगती पुस्तक म्हणावं खरंतर)उतरत्या आलेखाचं हेच कारण...

शाळेमध्ये मागे मी सांगितल्याप्रमाणे एक राजघराण्यासारखा विद्यार्थ्यांचा संच असतो. त्या खालोखाल ४० ते ६० टक्के दरम्यान मार्क मिळवणाऱ्या मुलांचा संच असतो. त्यांना गॉसिपिंग करायलाच खूप आवडतं. ते स्वतः शक्यतो सर्व बाबतीत तटस्थ असतात. म्हणजे दरवर्षी पास होऊन पुढच्या वर्गात जाणे. कधी शक्यतो कुठल्या स्पर्धेत भाग घेणार नाहीत. मग प्रेमाच्या भानगडीत तरी कुठून पडणार. तो गट आपले काम इमानेइतबारे करत असतो. मला काही कारणासाठी शिक्षकांनी उभं केलं तर तिच्या चेहऱ्याचं निरीक्षण करणे आणि तिला उभं केलं तर माझ्या चेहऱ्याचं निरीक्षण करून भाव तपासणे आणि त्यावरदेखील गॉसिप करण्यात ते स्वतःला व्यस्त ठेवत... अशा गटातील मुलांना एखादी माहिती मिळाली तर ती वर्गभर, शाळाभर आणि बऱ्याचदा शाळेच्या आसपासच्या परिसरात देखील पसरू लागते. माझ्या बाबतीत पण तसंच झालं. या संचातल्या मुलांना ही माहिती मिळाली (बहुतेक चन्याकडून कारण तोदेखील याच संचाचा भाग होता) ती पसरू लागली.

या संचाखालोखाल एक गट  असतो. यात नापास होऊन आलेले किंवा जास्तीत जास्त ४०टक्के मार्क मिळवणारे मित्र असतात. प्रत्येक रांगेतल्या शेवटच्या तीन बाकांवर त्यांची सत्ता असते. आई बाबा शाळेत पाठवतात म्हणून ते येतात. दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणारी ही मंडळी मस्ती, दंगा, भांडणं इत्यादी करणे.

वर्षभर दुसऱ्याच्या वहीतून गृहपाठ उतरवून काढण्याचा सराव करतात आणि परीक्षेत त्या सरावाचा त्यांना फायदाच होतो.

तर अशी ही तिसऱ्या संचातील मुलं यांचा प्रेमा-बिमाच्या भानगडीत खूप इंटरेस्ट असतो. ते स्वतःहून प्रेमप्रकरणांमध्ये येतात आणि कुठल्या तरी एका पक्षाची बाजू घेतात. ओघाने मलादेखील या गटातील मंडळींची साथ लाभली. (उगाच खोटं कशाला बोलू. )या संचातील मुलांना इतरांचं यश आपलंच वाटतं त्यातच ते धन्यता मानतात असो... तिच्यात आणि माझ्यात जणू काही स्पर्धाच सुरु झाली. तिनेही माझ्यावर भाळावं किंवा तिने सतत माझाच विचार करावा. यासाठी ठळक असं काहीतरी करावं. म्हणजे सगळया प्रश्नांची उत्तर शिक्षकांनी आपल्यालाच विचारावी ती आपण सगळयात आधी द्यावी. स्पर्धांमधून आपल्याला बक्षीस मिळावं आणि तिनेदेखील आपलं कौतुक करावं असं नेहमी वाटायचं. असं वाटण्यामुळं बहुतेकदा आपलं हसं व्हायचं.

आजही स्वतःचीच, लाज वाटावी अशी एक घटना इथे सांगावीशी वाटते... प्रशिक्षणार्थी शिक्षिकेचा तास सुरु होता. (चेंबूरच्या कॉलेजमधून यायच्या त्या) गणिताचा तास होता. त्यांच्या शिकवण्यावर लक्ष ठेवण्यासाठी दोन-तीन ज्येष्ठ, अनुभवी शिक्षक मुलांच्या सोबत बसायचे. थोडंसं गंभीर वातवरण असायचं अशा वेळी. त्या मॅडमनी विचारलं, तुम्हाला संच माहित आहे का?, सांगा पाहू एखादा संच" मला संच ऐवजी संत ऐकू आलं. मी उत्तर देण्यासाठी हात वर केला त्यांनी मला विचारलं मी उभा राहिलो आणि म्हटलं, "संत एकनाथ"

वर्गभर सगळे मोठमोठ्याने हसू लागले. मॅडमनी पण कसंबसं हसू दाबलं... सगळे का हसतायत मला कळतंच नव्हतं. मग तिने पटकन हात वर केला आणि उत्तर दिलं, "नैसर्गिक संख्यांचा संच"तेंव्हा डोक्यात प्रकाश पडला आणि आपण केलेला मूर्खपणा समोर आला. आजही तसंच खजील झाल्यासारखं वाटतं ते सर्व

आठवल्यावर... बरं माझ्याच मनात असं सगळं सुरु होतं असं काही नाही. आमच्या इतर मित्रांचं देखील सुरु होतं असं... काहींचं बरं चाललं होतं... काहींचं माझ्यासारखं... त्यापैकी आजही सुखी वैवाहिक जीवन जगणारी जोडी एकच आहे... नुकताच त्यांच्या लग्नाचा तेरावा वाढदिवस साजरा केला... या जोडीने सलमान आणि भाग्यश्रीच्या 'मैने प्यार किया'पासून प्रेरणा घेतली होती... त्यामुळे ते एकमेकांसाठी प्रेम आणि प्रिया आहेत.... पण एक तुम्हालाही मान्य करावं लागेलच... त्याच वयातलं पाहिलं प्रेम खरं, प्रामाणिक आणि निरागस असतं. वासनांधतेची लागण त्याला झालेली नसते... मनात उमलेल्या कोमल भावनांना तिथे किंमत असते... आपणही फुलत उमलत असतो आणि बहरत असतो... प्रेम म्हणजे नक्की काय असतं हे कळायच्या आधीच प्रेमात पडलेलो असतो...

ती म्हणजे न संपणारा विषय... तिचं प्रेम मिळावं म्हणून आपण आंधळे झालेलो असतो. तिची एक झलक मिळावी म्हणून वेडेपिसे झालेलो असतो. तिच्या सहवासाहून अधिक कोणतं स्वर्गसुख असू शकतं? त्यासाठी आपण आपल्या जीवाची देखील कित्येकदा पर्वा केलेली नसते. अर्थात मी काही एवढा डेरर वगैरे नव्हतो. (नाहीतर उगीचच मला तुम्ही तसं समजाल). हळू हळू माझ्या प्रेमप्रकरणाची चर्चा वर्गातल्या तिन्ही संचातल्या मुलांमध्ये(मुलींना हे कळायला उशीर लागतो) होत होती. मला भीतीही तितकीच वाटत होती. तिला कळलं तर पुढे हे चर्चा करणारे आपलं अंग काढून घेतील आणि माझ्यावर मात्र उगीचच संकट कोसळेल. त्यासाठी शक्यतो कुणाच्या नजरेत येणार नाही असाच प्रयत्न असायचा.

अशा प्रेमप्रकरणाची एक गंमत असते. ती म्हणजे स्वतःच्या हातावर तिचं नाव लिहिणे त्याकडे पाहत राहणे आणि शाई उडाली कि पुन्हा गिरवून ती शाई गडद

करणे. हा कारण नसताना लावून घेतलेला स्वतःची समजूत काढण्याचा उद्योग असतो. त्यातदेखील सुख असतं.

एकदा असंच तिच्या नावाचं आद्याक्षर हातावर काढलं होतं आणि काही कारणास्तव पागे सरांसमोर उभा होतो. (बहुतेक छड्या खाण्याचाच कार्यक्रम असावा)हात पुढे केला आणि त्यांनी बरोबर पकडलं. ते म्हणाले, "हे हातावर काय रंगवलंयस ? " खोटे बोलण्यात आपण एक्सपर्ट आहोत असंच मला वाटायचं. पण पागे सरांच्या त्या अनपेक्षित आणि अवेळी प्रश्नाने मी गडबडून गेलो. काय बोलावं ते सुचेनाच. त्या गडबडीत ही मी बोललो, "सर माझं नाव काढलंय" ते काहीच बोलले नाहीत. पण ते म्हणतात ना चोराच्या मनात चांदणं, "सर बाकीची अक्षरं पुसली गेलीयेत त्यामुळे तेवढंच उरलय "त्यांनी विचारायच्या आधीच मी पुढच्या प्रश्नाचं उत्तर देऊन मोकळा झालो. त्यांनी चर्चेत जास्त वेळ न दवडता त्यांचा छड्या देण्याचा कार्यक्रम सुरु ठेवला कारण रांगेत बरेच जण होते. त्यावेळी वेळ निभावून गेली तेंव्हापासून हातावर नाव लिहिणं बंद केलं. हल्ली हल्लीच सैराट मध्ये तिच्या नावाचं इनिशियल हातावर गोंदलं असा उल्लेख आला होता म्हणून सांगतो. त्यावेळी ट्याटू ची फॅशन नव्हती. त्यामुळे पेनाने नाव लिहिणे किंवा कर्कटक(तत्सम धारदार वस्तू) वापरून हातावर ते कोरणे अशी प्रथा होती (बालक पालक सिनेमात सेम टू सेम दाखवलंय). ती आज आहे कि नाही ठाऊक नाही. त्यावेळी शक्यतो एकदाच प्रेमात पडायची पद्धत होती. तर असा तिच्या नावाचं आद्याक्षर हातावर कोरण्याचा मोह मलाही आवरला नव्हता, असं सगळं चाललं होतं.

मैदानात खेळताना ती आणि तिच्या मैत्रिणी खेळत असतील तिथंच आम्ही घिरट्या घालत असायचो. पावसाळ्यानंतर मैदानातील गवत काढण्यासाठी जेंव्हा शारीरिक शिक्षणाच्या तासाला मॅडम सोडायच्या त्यावेळी नेमकं तिच्या जवळच काम करतोय असा देखावा करायचा. तिच्या मैत्रिणींना देखील आता थोडा संशय येऊ लागला होता. त्यापैकी काही मी मानलेल्या बहीणीदेखील होत्या. त्यांनी इशाऱ्यात एक दोनदा माझ्या मनातलं ओठावर आणण्याचा प्रयत्न केला. पण मी वेड पांघरून आपण त्या गावचेच नाही असा वागलो. मी स्वतः काहीच करत नव्हतो. किंबहुना तसं ठरवलं देखील तरी तिच्याकडे आपोआप ओढला जायचो. तिच्याशिवाय दुसरं काही सुचायचंच नाही.

नेमकं काय होतंय कसं व्यक्त व्हावं तेसुद्धा कळायचं नाही. एकदा तर हिंदी मध्ये 'पुस्तक कि आत्मकथा 'या विषयावर हिंदीच्या मॅडमनी निबंध लिहायला सांगितलं होतं. मग काय एक बहुत ही घमंडी लडकी. उसका नाम ***** था. वो * * कक्षा मे पढती थी अशी सुरुवात करून तिच्या हातूनच त्या पुस्तकाला जखमी करून कपाटाखाली टाकलं. त्यानंतर ते पुस्तक आत्मकथा सांगू लागलं. ते वाचून मॅडमनी छान, मस्त असं काहीतरी कौतुक करणारे शब्द वापरले होते. (ते त्यांनी वर्गात वाचून दाखवावं अशी माझी मनोमन इच्छा होती. त्यानिमित्ताने का होईना ती माझा विचार करेल अशी मला आशा वाटत होती असो ).

वर्ष सरत चाललं होतं. वार्षिक खेळाच्या स्पर्धा सुरु झाल्या. मस्त आठवडाभर धमाल असायची. मी शक्यतो कोणत्याही खेळात वगैरे भाग घ्यायचो नाही. ती ही घ्यायची नाही. (हुशार मुलांनी मैदानी खेळात भाग घ्यायचा नसतो अशी आपली माझी भाबडी समजूत होती) तरी तिचा पाठलाग सुरुच असायचा. एकदा तिने कोणत्यातरी खेळात भाग घेतला. खेळताना तिला शर्ट हवा होता

घालायला. तिच्यासोबत असलेल्या घोळक्यातून कुणीतरी माझं नाव सुचवलं. मलाही वाटलं होतं स्वतःहून विचारावंस पण ते काम माझ्याविषयी संशय असलेल्या तिच्याच कुणीतरी केलं होतं. ती स्वतः आली आणि तिने मागायच्या आतच मी काढून तो दिला. (सलमान खान वगैरेंनी बहुतेक नंतर ती स्टायल चोरली असावी असा अंदाज आहे) मनातल्या मनात आनंद तर खूपच होता. शर्ट काय तू आज्ञा केली तर शरीराचं कातडं देखील तुझ्या चरणी अर्पण केलं असतं. माहितीये मला... थोडं अतीच होतंय पण त्यावेळी हेच विचार मनात येत होते. डोळे भरून तिचा खेळ पाहिला. कोण हरलं... कोण जिंकला... कोणता खेळ काहीच आठवत नाही. हो इतकं आठवतंय चिंचेच्या झाडाजवळ खेळ होता. आम्ही सावलीत उभे राहून खेळ पाहत होतो. तो शर्ट पुन्हा मिळाला तो किंचितसा सुगंधित झाल्यासारखं वाटलं. काहीतरी वेगळाच आनंद तो शर्ट घातल्यावर जाणवला... आईला सांगावस वाटलं आता हा शर्ट कधीच धुवायचा नाही. तसं बोलायची आणि त्यानंतरच्या प्रश्नांना उत्तर द्यायची हिंमत नव्हती म्हणून सगळं काही आतल्याआतच दफन झालं...

माझा वर्गमित्र निलेश पवार ( मधल्या सुट्टीत न चुकता वडा पाव खाऊ घालायचा त्याला स्मरून ) च्या संकल्पनेतून साजरा केलेल्या माजी विद्यार्थी संमेलनाच्या निमित्ताने शाळेत पुन्हा यायची संधी मिळाली. तेंव्हा मन आठवणीत रमलं. कालानुरूप सगळं काही बदलतं. तसा नियमच आहे प्रकृतीचा.

मला आठवला पहिला दिवस जेंव्हा मी शाळेत पहिल्यांदा आलो होतो. असं वाटलं निसर्गाच्या कॅनव्हास वर कुणीतरी खूप मस्त रंगांची उधळण करून सुंदर चित्र काढल्यासारखंच.

शाळेच्या मोठ्या प्रवेशद्वारातून आत आलो. पिवळया रंगाचं गेट किंचितसं गंजलेलं त्यावर लिहिलेली सूचना, "हा रहदारीचा रस्ता नाही. " त्याच्या नंतर मस्त हिरवं हिरवं वाऱ्यावर झोके घेणारं पावसात ओलं झालेलं गवत असलेलं मैदान. त्या गवतातून सी सी होम च्या दिशेला जाणारी हिरव्या मैदानात स्पष्ट दिसणारी पायवाट. पायवाटेच्या दुसऱ्या टोकाला हिरवंगार बहरलेलं चिंचेचं झाड. त्याच्या पाठीमागे हिरवाकंच उंचच उंच अणुशक्ती नगरचा डोंगर... मैदानाच्या पलीकडे आगगाडीसारखी लांबलचक पसरलेली शाळा. उरल्या जागेत कडेने असलेली झुडपं आणि त्याच्या मागे मस्त मस्त हिरवी शेती... अशोकाच्या आणि जांभळाच्या झाडाच्या गर्दीत शाळेचे वर्ग आणि मुख्याध्याकांचं कार्यालय, स्टाफरूम. तिथे उजव्या बाजूला असलेल्या वर्गाच्या मागच्या भिंतीवर छत्रपती शिवाजी महाराजांचं मोठं चित्र आणि डाव्या बाजूच्या वर्गाच्या भिंतीवर स्वातंत्र्यवीर सावरकरांचं चित्र. दोन्ही चित्रे हुबेहूब काढली होती अगदी जिवंत वाटावी अशीच. त्याच्या खाली 'राम पागे'(ती सही हृदयावर कायमची कोरली गेली आहे) अशी काळ्या रंगातली सही. असं वातावरण होत. ते वातावरण आता जाणवत नाही. निरनिराळ्या कारणांनी मी शाळेत संस्थेत जातो पण ते वातावरण ती शाळा शोधत असतो आणि त्या शाळेत तीला शोधत असतो. (मुद्द्याला हात घालायलाच हवा).

सातवीचं वर्ष सरत आलं होतं. वार्षिक परीक्षा सुरु झाल्या. नावाप्रमाणे तिच्या आणि माझ्या हजेरी क्रमांकात बरंच अंतर होतं. त्यामुळे तिचा आणि माझा

नंबर कधीच एकाच वर्गात आला नाही. त्यामुळे पेपर सुरु व्हायच्या आधी गपचूप ती ज्या वर्गात असेल तिथे एक फेरी मारून यायचो. बरं वाटायचं. पण मनात एक हूरहूर होती. सुट्टी लागल्यावर तिला पाहता येणार नाही. (मनात 'कल कॉलेज बंद हो जायेगा... तुम अपने घर को जाओगे.. किंवा आयेगी मेरी याद... जब होगा बुरा हाल सारखी विरह गाणी देखील आपसूक वाजत होती). तशी हुरहूर दिवाळीच्या सुट्टीत पण लागायची पण त्या सुट्ट्या कमी असायच्या आणि त्या सुट्ट्यात ती गावीपण सहसा जायची नाही. दिवसातून एकदा तरी ती दिसेल म्हणून तिच्या घराजवळून फेरी मारली कि ती दिसायची. पण उन्हाळयाच्या सुट्टीत ती गावी जाणार होती.

प्रगती पुस्तकात मुलं खाडाखोड करून मार्क वाढवतात. घरच्यांना खोटंच सांगतात म्हणून मुख्याध्यापक सरांनी सगळयांचे निकाल पोस्टाने पाठवले जातील असे जाहीर केलं होतं. त्यासाठी सगळयांना आपला पत्ता लिहिलेलं पाकीट वर्गशिक्षकांकडे जमा करायला सांगितलं होतं. जमा केलेल्या पाकिटावर तिच्या गावचा पत्ता वाचला होता. त्यामुळे ही विरहाचा हा काळ कसा घालवायचा हा यक्ष प्रश्न होता.

ठरल्याप्रमाणे निकाल पोस्टाने आला. गुणानुक्रमांक ** मिळवून आठवीच्या वर्गात गेलो होतो. मला खात्री होती ती देखील पास होऊन गेलीच असणार. आता शाळा कधी सुरु होईल या विचाराने मी अगदी अधीर झालो होतो. एक एक दिवस अगदी एका एका युगासारखा वाटत होता.

अखेर ती प्रतीक्षा संपली शाळा सुरु झाली. नवीन वर्ग, नवीन दप्तर, रंग बदललेला नवीन गणवेश (आकाशी रंगाचा शर्ट आणि निळी हाफ पॅन्ट तेंव्हा) सगळं काही नवीन. खूप खूप उत्सुकतेनं तिची वाट पाहत होतो. नेहमीच्या वेळेपेक्षा आधी गेलो होतो. शाळा भरली सगळयांनी आप आपल्या जागा पकडल्या (तिथे आरक्षण

वगैरे भानगड नव्हती जो पहिला येऊन बसेल त्याची जागा). ती आली नव्हती त्यामुळे ती आली तर कुठे बसेल त्याप्रमाणे जागा ठरवायची असा विचार सुरु होता.

वर्गशिक्षक कावळे सर आले त्यांनी हजेरी घेतली पहिला दिवस होता मुलं कमी आली होती. त्यामुळे जास्त काही शिकवलं नाही. त्यांचा तास संपला तरी ती आली नाही. आधी वाटलं उशिरा वगैरे येईल. आजपासून शाळा सुरु होणार असल्याचं बहुतेक तिच्या लक्षात नसेल असंही वाटलं. ती काही आली नाही. दिवसअखेरी लक्षात आलं हजेरी घेताना तिचं नावच घेतलं नाही सरांनी. तिने शाळा बदलली वाटतं असं वाटलं. मी गुपचूप हजेरीपुस्तक पाहिलं त्यात तिचं नाव खरंच नव्हतं आणि मला खूप खूप वाईट वाटलं. कश्या कश्यात म्हणून मन रमेना. कोणाशी बोलावंसं वाटेना. खवशीकर सर, पाटील सर, खळे मॅडम काय शिकवतायत ते ऐकूच येईना. भलत्याच तंद्रीत राहू लागलो. एकदा तर " इनामदार, लक्ष कुठं आहे तुझं ? मोटार पहिली नाही कधी ? असा पाटील सरांचा मोठा आवाज कानाजवळ घुमला आणि मी जागा झालो. मी खिडकीच्या बाहेर पाहात आपल्याच तंद्रीत होतो.

कसा बसा एक आठवडा निघून गेला. चन्या तिच्याच चाळीत राहत असल्याचं आठवलं. म्हटलं त्याला नक्कीच माहित असणार ती का आली नाही शाळेत. त्याला विचारावं तेंव्हा चण्याला एकट्यात गाठून विचारायचा मी विचार केला. त्याप्रमाणे त्याला गाठलं आणि त्याला विचारलं. नेहमीसारखाच भाव खात (व्हिलन कुठला ?? ) त्याने सांगायला सुरुवात केली....

पुढच्या आठवड्यात पंधरा ऑगस्ट(२०१६) आणि लगेच रक्षा बंधन आहे. पंधरा ऑगस्ट हा राष्ट्रीय सण असल्यामुळे एक वेगळाच उत्साह संचारलेला असतो. वातावरण पावसाळी जरी असलं तरीदेखील शाळेत जाण्यापासून पाऊस आपल्याला अडवत नाही. स्वच्छ धुतलेले कपडे(त्यानिमित्ताने पालकांनी कपड्याना इस्त्रीपण

केलेली असते). सकाळी तयार होऊन निघायचं वाटेत असणाऱ्या शिवशक्ती, कुमार किंवा जीवन या (मानखुर्दच्या इतिहासातील नामांकित )स्टेशनरी दुकानातून झेंडा घ्यायचा. तो डाव्या बाजूला खिशाच्या वर लावायचा किंवा बाह्यांना वगैरे पण लावतात काही जण असो. शाळेत सगळे शिक्षक, कर्मचारी पांढऱ्या शुभ्र पोशाखात दिसतात. झेंडावंदन, भाषणं, समूहगीत खूप भारी वाटतं. चिखल असल्यामुळे

सगळा कार्यक्रम उभा राहूनच पाहावा लागतो. त्याचं इतकं काही नाही. उत्साह आणि आनंद ओसंडून वाहतो त्यावेळी. त्यात तिनं भाषणात भाग घेतलेला असेल ती काय बोलते ते ऐकूच यायचं नाही तिच्याकडे बघण्यातच वेगळा आनंद. (अशावेळी आपल्याकडे कोणाचं लक्ष नसतं). त्यामुळे न चुकता वेळेत पोहोचायलाच हवं असं ठाम ठरवलेलं. रक्षाबंधन जवळ असला कि मात्र या विरुद्ध परिस्थिती असायची. शाळेत जायची इच्छाच होत नसायची. गेलो तरी उशिरा जायचं गप्प बसायचं. जगातल्या कुठल्याही मुलीला आपण दिसावं आणि तिने राखी बांधली तरी काही हरकत नाही. तिला मात्र आपण दिसू नये. दिसलो तरी तिच्या मनात आपल्याला राखी बांधण्याचा विचार अजिबात येऊ नये. खरंच तो आठवडा नीट गेला कि हायसं वाटायचं. त्यामुळे आतादेखील बरंच वाटतं. तिचं सुरक्षाकवच असलेल्या तिच्या मैत्रिणी मला राखी बांधायच्या पण तिने तो विचार कधीच केला नाही. शाळेत येताना घरापासून निघून पुन्हा घरी सुरक्षित सोडण्याची जबाबदारी असलेली तिची मैत्रीण सावलीसारखी सोबत असायची (गावातील चाळीत कुठेतरी राहायची)त्या

मैत्रिणीने देखील राखी बांधली होती. पण तिने नाही असो... (उत्सुकता जास्त ताणणे बरे नाही)

" ती नाही येणार बहुतेक "चन्या म्हणाला, "ती अजून गावीच आहे, त्यांनी पनवेल ला नवीन घर घेतलंय, तिकडे जाणार आहेत राहायला तिकडच्याच शाळेत तिला आणि तिच्या भावंडांना ऍडमिशन घेऊन दिलंय. "

चन्या हे सांगत होता मला आणखी दुःखी करत होता. मनात आपलं सुरु होतं आता शाळेत का यायचं ? तिच्याशिवाय मन रमेल का शाळेत ? अनेक प्रश्न मनात पिंगा घालत होते. आशेचा शेवटचा किरणदेखील विझला होता. मन खट्टू झालं. (असंच काहीतरी म्हणतात) मुन्सिपाल्टी शाळेत दुसऱ्या वर्गापासून ती सोबत होती. पाचवीला मी माध्यमिक शाळेत आलो आणि ती तिथेच राहीली होती. (तेंव्हा प्रेमबीम काही नव्हतं बरं का ) सहावीला ती पुन्हा माझ्याच वर्गात आली होती.

आता पुन्हा ती गेली कधीच न येण्यासाठी, कुठे शोधायचं तिला ? पनवेल नेमकं किती लांब आहे कसं जायचं वगैरे  वगैरे प्रश्नांची खूप गर्दी झाली मनात. पापण्या किंचित ओलावल्या पण मी स्वतःला सावरलं. (चण्याला झालेला राक्षसी आनंद त्याच्या चेहऱ्यावर जाणवत होता. त्याने माझ्या डोळयात पाणी पाहिलं असतं तर गावभर करून नको नको ते टोमणे ऐकायला लावले असते. )

दिवस कसेबसे चालले होते. मी अबोला धरला होता. कुणाशीही पाहिल्यासारखं बोलत नव्हतो. तिच्या सुरक्षाकवचातील माझ्या बहिणींपैकी एकीने चक्क विचारलं देखील, "ती गेली म्हणून त्याची शिक्षा आम्हाला का ?, पूर्वीसारखा हसत बोलत नाहीस, तुझे फालतू विनोद सांगून आम्हाला बोर करत नाहीस". तेंव्हा मी तिला खोटं खोटं हसत, "चल काहीतरीच बोलू नकोस, तू समजतेस तसं काही नाही "नजर चोरून निघून गेलो.

रविवारी सुट्टी असून घरात देखील अस्वस्थ राहायचो. गल्लीतली पोरं क्रिकेट खेळायला बोलवायची पण मी अभ्यासाचं कारण देऊन जायचो नाही. जंगल जंगल बात चली है पता चला है म्हणत मोगली(रुडयार्ड कीप्लिंग जंगलबुक वर आधारित)दूरदर्शन वर यायचा पण त्याच्याकडेदेखील लक्ष द्यावंसं वाटायचं नाही. एक दिवशी वेळेवर शाळेत गेलो. (लवकर जायला काही कारणच उरलं नव्हतं. ) माझ्या जागी बसलो(निलेश पवार च्या शेजारी). शाळेत मुलामुलींचे काही अलिखित नियम होते आज आहेत कि नाही माहित नाही. मुळात शाळेत बाहेरचे आणि संस्थेतले असे दोन गट असायचे. एक संस्थेचा गट सी सी होम कडून यायचा. बाहेरचा गट गेट कडून यायचा. ज्या बाजूला दरवाजा असेल तिकडे मुलांची जागा आणि विरुद्ध बाजूला मुली बसायच्या. स्टेशन कडून ट्रॉम्बेकडे जाणारा रास्ता मुलांसाठी व त्याच्या उलट दिशेचा रास्ता मुलींसाठी असे अलिखित नियम तेंव्हा पाळले जायचे असो.

या नियमानुसार खिडकीच्या बाजूला मुली बसायच्या तिकडे सहज नजर फिरवली. डोळयावर विश्वासच बसला नाही. ती चक्क खिडकीच्या कडेला बसलेली दिसली. मला वाटलं स्वप्नंच पाहतोय. मी इकडे तिकडे पाहिलं आणि मग पुन्हा तिच्याकडे चोरून पाहिलं. कशी काय ही पुन्हा आली (बहुतेक माझ्याचसाठी असंही वाटलं. )मागे बसणाऱ्या तिसऱ्या संचातल्या आणि आजूबाजूला बसणाऱ्या मुलांचे चेहरे वाचले ते माझ्याकडे बघून मिश्कीलपणे हसत होते. प्रवीणने टपलीपण मारली मागून. मग चण्याकडे पाहिलं रागात, त्याचा चेहरा उतरला होता.

आता मात्र खात्री झाली ती परत आली. आनंद गगनात न मावणे, दिल बाग बाग होणं वगैरे हिंदी मराठीतले सगळे वाक्प्रचार डोक्यात फिरले त्यांचा वाक्यात उपयोग करूनदेखील घेतला मनातल्या मनात… काय वर्णावा तो आनंद (तुम्ही समजू शकता)

'शाळेतला गुलाबी दिवस 'खरंतर एकाच भागात पूर्ण करण्याच्या हेतूने मी लिहायला घेतलं. परंतु वेळेअभावी पूर्ण न झाल्याने त्याचा दुसरा भागही लिहावा लागला. सर्व वाचकांचा प्रतिसाद पाहता मी पुढचे भाग पण लिहले आणि आता पुढेही लिहितोय. डेली सोप(दैनं 'दीन' मालिका) च्या या काळात माझी ही कथा आपण सर्वानी मनापासून स्वीकारली आहे. त्यामुळे आता तुम्हाला काही काळ हे वाचवचं लागेल. होणार सून मी या घरचीतील जान्हवीच्या न झालेल्या बाळाची किंवा हल्लीच्या काहे दिया परदेस मधल्या शिव गौरी च्या लग्नाची आतुरतेने प्रेक्षक वाट पहात आहेत तितकीच वाट माझ्या कथेच्या पुढील भागाची वाट पाहतात याची प्रचिती काल पंधरा ऑगस्ट च्या ध्वजवंदन कार्यक्रमावेळी गुरुजनांनी, मित्रानी केलेल्या तोंडभरून कौतुकातून आली.

खरंतर मॅडमनी फोनवर म्हणाल्या तूला पाहायचंय मला तू इतका छान लिहितोस तुझं कौतुक करायचंय तेंव्हाच माझे डोळे पाणावले होते. (सेंटी वेंती म्हणतात ना तसं तेंव्हा माझ्या मनात गोखले सरांची सहज एक चारोळी डोकावून गेली

हो आहेच जरा असा मी

एकटा एकटा राहणारा

वाळकं पान देखील गळताना

तन्मयतेने पाहणारा

त्या निमंत्रणाने भारावून मी शाळेत गेलो. अमृताची गोडी काय असेल, स्वर्गसुख म्हणजे नेमकं काय याची उत्तर न सापडलेल्या मला जगातील खूप आनंदी

माणूस असल्याचा आनंद झाला. कौतुकाचा होणाऱ्या वर्षावात मी चिंब भिजत होतो आणि ते देखील मनातील वाट काढू पाहणाऱ्या भावनांना आवर घालत. कडा ओलावू पाहात होत्या पुन्हा पुन्हा मात्र मी पुन्हा मनाला समजावत होतो. इतक्या लोकात हसं होईल असं वागू नको. माझ्या डोळयात हा भाव बहुतेक शिक्षकांनी हेरला असेल याची खात्री आहे. 'शाळेतले' गुलाबी दिवस असं अनेकवचनी नाव लिहावं असं वाटत होतं पण म्हटलं व्याकरणातील ही चूक अर्धा मार्क कापून सर्व शिक्षक पदरात घेतील म्हणून मुद्दाम नाव तसंच ठेवलं होतं पण आता बदललंय. मला पाचवीपासून इंग्रजी शिकवणाऱ्या आणि सध्याच्या मुख्याध्यापिका गवंडळकर मॅडम(पोकळे मॅडम) या महिन्याअखेरीस निवृत्त होतायत. त्यांच्यासोबत खूप गप्पा मारता आल्या. जुन्या आठवणी डोळयासमोर तरळत होत्या असो.

काल सर्व शिक्षक माझं कौतुक करत असताना, त्या विद्यार्थ्यांच्या गर्दीतून ती मला खुणावत स्मितहास्य करत दुरून निघाल्याचे दिसत होते. वाटलं, "अगं ये बाई ये, हे सगळं कौतुक तुझ्याचमुळे आहे, तुझंच नाव विचारतायत सगळेजण तूच भेटून सांग यांना तू कोण ते "अशी मोठयाने हाक मारावी पण ती दुरूनच निघून गेली. शाळेचा गणवेश ओढणीला पिन टोचून लावलेला तिरंगा, काळया रिबिनींची फुलं करत बांधलेल्या दोन वेण्या, दोन्ही भुवयांच्या मधोमध हलकीच लावलेली टिकली आणि कपाळावर रेंगाळलेली पुन्हा तीच केसांची लाडिक बट. ती बट जणूकाही मला चिडवत आहे ओठांखालचा तीळ जणू मला जखमी करत आहे. मी कसाबसा भानावर आलो जेंव्हा मला कुणीतरी हाक मारली असो.

ती शाळेत पुन्हा आली होती आणि तिला खूप दिवसांनी पाहून एक वेगळीच दैवी शक्ती (अंगात वैगेरे आलं नाही) संचारल्यासारखं वाटत होतं. सब्र का

फल मीठा होता है म्हणतात नाव त्याची प्रचिती अशीच असावी असं मला वाटलं. तिला पाहून मला काहीच सुचत नव्हतं आनंदाने वेडा पिसा होणे या वाक्प्रचाराचा अर्थ तोच असावा. तसंच काहीतरी झालं होतं तिच्या दर्शनाने. मी स्वतःला आनंदाने बेभान होऊन नाचण्यापासून रोखलं होतं (खूप महत्प्रयत्नाने कठीण असताना देखील).

चण्याकडे लक्ष गेलं आणि आनंदाचं रूपांतर चण्याबद्दलच्या रागात होऊ लागलं. याला विचारायचंच मला खोटं का सांगितलंस ते. तास संपला तसा लगेच मी त्याच्या बेंचजवळ पोहोचलो. तिच्याकडे पाहात मी त्याला खुणवत हळूच विचारलं, "तू खोटं का बोललास, ती जर येणार नव्हती मग कशी काय आली आज ?"

त्यानेही आश्चर्य व्यक्त करत उत्तर दिलं, "मलापण कळत नाय कशी काय आली. तिच्या बॉडीगार्ड (तिच्या आईला चन्या प्रेमाने बॉडीगार्ड म्हणायचा, अर्थात उंची आणि शरीरयष्टी विचारात घेऊन त्याला ते नाव सुचलं होतं)ने मला जे सांगितलं होतं तेच सांगितलं. मी काही बोललो नाही. "मी विचारून सांगतो तुला " चन्या पुढे म्हणाला. " नको काही गरज नाही त्याची, आलीये ना आता मग कशाला उगीचच"मी त्याला जळवण्याच्या प्रयत्नात हसत हसत बोललो.

या बॉडीगार्ड वरून आठवलं. खरंच मी पण खूप घाबरायचो तिच्या आईला (बॉडीगार्ड). हल्ली बाउंसर्स पाहिले कि आठवण होते तिच्या आईची. रस्त्याने चालताना पोरं तिच्या आईला पाहिलं कि ती बघ रशिद ची सासू चाललीये, कोणी कोणी सासू माँ (रिमा लागू, सुप्रिया पिळगावकर अभिनित तू तू मै मै या मालिकेच्या प्रभावाने सासू आई झाल्या) म्हणून चक्क मोठ्याने हाक मारायचे. मनातल्या भीतीच्या जागी हलकीच लाज वाटायची. अगदी नवविवाहित नुकत्याच सासुरवाशीण झालेल्या मुलीच्या डोळयात आणि चेहऱ्यावर असते तशी.

आम्ही सगळे तिच्या वर्गातले आणि त्यातले बरेच तिच्या घराशेजारी राहणारे असल्याने सासूबाईला(न झालेल्या) बहुतेकांचे चेहरे ओळखीचे असायचे. त्यापण आमची मस्ती पाहून हसायच्या पण त्यांना कळायचं नाही काय चाललंय ते. कळत नव्हतं तेच बरं होतं नाहीतर त्यांनी एक एकाला अलगद उचलून आपटलं असतं. तिचे वडील गोरे गोमटे अगदी गोऱ्या सायबासारखे कधीतरीच शाळेत यायचे किंवा कुठेतरी दिसायचे त्यांच्याबद्दल मला भीती ऐवजी विलक्षण आदर वाटायचा. (वाटायचं हे पण सासूबाईंना घाबरत असतील नक्कीच)असो.

एकदा मला खूप आनंदही झाला होता आणि दुःख ही. कावळे सरांनी हिंदीतील एका धड्याचे शब्दार्थ लिहून आणि पाठ करून यायला सांगितले होते. पुरासंबंधीचा धडा होता त्यातलं एक अजूनही आठवतंय 'हथीयारो से लेस = सर्व उपकरणांसहित "(चुकलो असेल तर क्षमस्व) ते वर्गात आले कि शुद्ध हिंदीतच बोलायचे त्यांची शैली खूपच वेगळी वाटायची आणि अगदी जिभेवर साखर ठेवून हिंदी बोलतायत असेच वाटायचे. त्यांनी हजेरी घेतल्यानंतर विचारलं कुणी कुणी लिहून आणलेलं नाही. त्यांनी उभे रहा. निम्म्यापेक्षा जास्त मुलं-मुली उभी राहिली. त्यानंतर ज्यांनी लिहिलंय त्यांच्या वह्या जमा करून घेतल्या. बसलेल्याना शब्दांचे अर्थ विचारायला सुरुवात केली(हा आश्चर्याचा धक्का होता खरंतर ). अर्थ लक्षात नसल्यामुळे बाकीच्यांनाही उभे राहावे लागले. मग त्यांनी आणखी एक संधी दिली. अजूनही कोणाला प्रयत्न करायचा असेल तर पुढे येऊन शब्दांचे अर्थ सांगायला सांगितले. मी पुढे गेलो आणि कसं कुणास ठाऊक मला येत असलेलेच शब्द सरानी विचारले आणि मला बसायला सांगितलं. अख्खा वर्ग उभा(सरसुद्धा उभे राहून शिकवत होते)आणि मी एकटाच बसलेलो. किती मोठा आनंद आता मला खात्री होती तिच्या मनात मी नक्कीच आता भरलो असेन.

नंतर वाईट वाटलं अरे ती उभी राहून शिक्षा भोगत असताना आपण कसे काय बसलो. अख्खा वर्ग उभा असला तरी काही बिघडत नाही पण ती उभी असताना आपण कसं काय बसलो. खूप वाईट वाटलं. ती पण मनातल्या मनात बोटं मोडत असणार. आता उभंही राहता येणार नाही. नाहीतर सगळे हसतील याची भीती. तासभर वर्ग उभा होता आणि बसलेलो. तास संपला ती बसली तेंव्हा कुठे मला बरं वाटलं....

आजही खूप(म्हणजे कायमच)अभिमानाने (किंबहुना गर्वाने)सांगतो मी सगळयांना. आमच्या शाळेइतकं मोठं मैदान मुंबईतल्या कुठल्याच शाळेला नाही. इतकं प्रसन्न वातवरण कुठल्याच शाळेत नसायचं. संस्थेतून शाळेकडे येण्यासाठी अधिकृत मार्ग असला तरी shortcut चा मार्ग वेगळा होता. आगरवाडी मधून रस्ता ओलांडला कि मागील बाजूने शेतकऱ्यांच्या वस्तीतून नाला ओलांडून पायवाट रिमांड होम कडून थेट शाळेच्या शौचालायाशेजारी यायची. या वाटेवरून एखाद्या कृष्ण धवल(black n white)सिनेमातील गाण्यासारखं वाटायचं. एक चिंचेचं उंच गर्द सावलीच झाड तिथे होतं. त्या सावलीत झाडाला टेकून बसलं कि इतकं मस्त वाटायचं कि आज वातानुकुलीत ऑफिस मध्ये आरामदायी खुर्चीला पण त्याची सर येणार नाही. पुढे असलेला नाला पावसाळ्यात भरून वाहायचा पण इतर वेळी त्याची धार कमी असायची म्हणजे उडी मारून सहज ओलांडता येईल अशी. त्या नाल्यावर इलायची चिंचेचं झाड आडवं वाढलं होतं त्या झाडाच्या फांदीवर बसून मस्त गारव्यात आणखी मजा वाटायची. इतर वेळेपेक्षा वार्षिक परीक्षेच्या आधी तिथे बसून वाचायला खूप भारी वाटायचं कारण वाढत असलेल्या उन्हाळयासोबत वातावरणात गरम होत चाललेलं असायचं. त्यावेळी या जागी आल्हाददायक गारवा जाणवायचा,

त्या ठिकाणी सहसा कोणी यायचं नाही. त्यात वातावरणात एक वेगळंच संगीत, लय जाणवायचं. नाल्याच्या वाहणाऱ्या पाण्यातून आणि भाजीच्या शेतीला पाणी देण्यासाठी त्या पाण्यात लागलेल्या पंपाचा आवाज आणि कधी कधी शेत नांगरणाऱ्या ट्रक्टरचा आवाज एक वेगळाच ठेका धरलेला असायचा या सगळ्यांचा आणखी प्रसन्न वाटायचं. याशिवाय मागच्या बाजूला असलेले पडके बराक ज्यांना आपण खंडहर, सात कोणटा या नावाने ओळखायचो गर्द झाडीत एक विलक्षण उर्जा असायची. एक प्रसन्नता असो..

मागच्या दोन वर्षापूर्वी मी एक गाणं टी व्हीवर पाहायचो 'देवा मला रोज एक अपघात कर, तिच्या नाजूक हाताने जखमा या भर' तसंच मलाही वाटायचं. मलाही असा काहीतरी अपघात घडावा त्यामुळे तरी तिच्या मनात माझ्याबद्दल प्रेम निर्माण होईल. प्रेम निर्माण नाही झालं तरी ती आस्थेवाईकपणे चौकशी तरी किमान करेल.

तू माझी वाट पाहताना

मला चोरून पहायचंय

त्यासाठी मला लपून राहायचय

असंच काही वाटायचं. त्यामुळे टोल पडला तरी मी आणि माझ्यामुळे माझे जिवलग मित्र (बहुतेक तिसऱ्या संचातले)शेतामध्ये मस्ती करत, एकमेकांची खेचत, गप्पा मारत बसायचो. टोल पडला कि पळत सुटायचो त्यामुळे बहुतेकदा प्रार्थना मैदानात किंवा वर्गासमोरच असताना व्हायची आणि आम्ही प्रार्थनेनंतर वर्गात प्रवेश करायचो. त्याचं कुणाला काहीच वाटायचं नाही. काही वेळा छड्या पडल्या आहेत. पण त्याचा मूळ उद्देश कधी सफल झाल्याचं दिसलं नाही.

ती नव्हती वाट पहात पण दुसरं कोणीतरी नक्कीच वाट पहायचं. मला जरी ती आवडत होती तरी मी दुसऱ्याच कुणालातरी आवडत होतो हे लक्षातच येत

नव्हतं. (कहाणी में ट्विस्ट वगेरे काही नाही किंवा प्रेमाचा त्रिकोण वगेरे नाही) कारण ती(आता वाट पाहणारी दुसरी ती असा अर्थ घ्यावा)विचारायची, "काय रे कुठं असतोस, रोज उशिरा येतोस?" इतक्यावरच न थांबता "रोज तर इतक्या लवकर येतो शाळेत आणि वर्गात सगळ्यात शेवटी असं का ?"

मग मला मनात प्रश्न पडायचा हिला कसं काय माहित ? पण मी तिच्याकडे बघत हसून म्हणायचो, "कुठे उशीर झालाय आलोय कि वेळेत. "ती अल्हड, निरागस होती अगदी गोड आवाज होता तिचा. कधी कधी मला चिडवायची आपली पोरं, तिच्या नावानेसुद्धा. पण मी कधी इतकं मनावर वगेरे घेतलं नव्हतं. मलाही त्याची जाणीव आता होऊ लागली होती. ती अगदी जवळ बसलेली असायची हजरजबाबी मिश्कीलपणा इतका होता कि परफेक्ट टायमिंग वर कमेंट मारायची आणि मला प्रश्न पडायचा हसू कि तिच्यावर रागावू आणि खरंच हसू आवरायचं नाही.

स्टेशनमधून बाहेर पडलं कि डाव्या वळणावर तंबाखूचे, उदबत्त्या, नारळ आणि पूजेच्या साहित्याचं दुकान त्याला लागून राम, सीतामाई आणि हनुमंताची मूर्ती असलेलं मंदिर. भाविकांची वर्दळ कायम असलेलं हे छोटं मंदिर त्यातून दरवळणारा उदबत्त्यांचा वास, त्याच्या समोरच एक काळी टोपी घातलेली लालेलाल टपालपेटी (हल्ली दिसत नाही). तिच्याच शेजारी एक पानपट्टी(कायम विडी सिगरेटीचा वास येणारी) तिथून थेट चर्च आणि पाडवा शाळेचा रस्ता. मुख्य रस्त्याने आपण शाळेकडे चालू लागतो. तेंव्हा उजव्या बाजूला असलेल्या बेकरीतून मस्त खमंग वास तसेच वडापावच्या गाडीवर तळले जात असलेल्या वड्यांचा आणि भजीचा वास. शाळेकडे जाताना आलेले हे निरनिराळे पण त्यापैकी बरेच मनाला प्रसन्न करणारे वास घेत(इच्छा नसली तरी) पुढे जाणे भाग असते. त्यानंतर रिक्षाच्या रांगेतून वाट काढत आपण मुन्सिपाल्टी शाळेपर्यंत पोहोचतो. पूर्वी ही रांग डॉ भगत यांच्या दवाखान्यापर्यंत असायची(नसेल आठवत तर पराग वाईन तरी आठवतंय का ?)

मागच्या आठवड्यात गेलो होतो तेंव्हा पाहिलं ही रांग दुपटीने वाढलीये. मुन्सिपाल्टी शाळेच्याही पुढे असते ही रांग असते असो. आपले काही विद्यार्थी शाळेत असतानाच रिक्षा चालवायचे... जास्त वेळा नापास झाल्यामुळे कमवायचं वयपण झालं असायचं काहीचं (उदरनिर्वाहासाठी वगैरे नाही. अभ्यास करण्याबद्दल उदासीनता आणि कुणाचातरी पाठलाग किंवा इम्प्रेस करण्याची मनीषा बाळगून)जगभरात होत असलेल्या स्थित्यंतरांना आपलं मानखुर्द तरी कस अपवाद असेल बरं. सेवाभावी वृत्ती लोप पावून संस्थेच्या मालमत्तेचा दुरुपयोग करण्याची वृत्ती बोकाळताना पाहून मनाला वाईट वाटलं. ज्यांच्याकडे आशेनं पाहावं तीच या चोरांना सामील असल्याचं कळल्यावर तर आणखीनच. स्वार्थी व श्रम न करता जास्त पैसे मिळवणारी लालसी मानसिकता मानखुर्द मध्ये देखील रुजताना दिसते आहे असो.

तर ती (दुसरी) माझ्या शेजारच्या रांगेत बसायची. खूप बोलघेवडी, बिनधास्त बोलणारी तिच्यातही देखणेपण होतं पण तरी सहसा तिच्या वाटेला कुणी जायचं नाही. ती माझ्याशी या ना त्या कारणाने बोलायचीच आणि कधी बोलता बोलता टाळी देणे, बाजूवर चिमटा काढणे किंवा गाल ओढणे वगैरे पण ती ओघात करायची, पण मला जाणवू लागलं होतं. हिच्या मनात देखील माझ्याबद्दल तसंच काही सुरु असावं. कारण एकदा स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी सकाळी मी घरातून निघालो. निघालो तेंव्हा पाऊस नव्हता. वाटेत पाऊस आला म्हणून आडोशाला थांबलो. तेंव्हा ती समोरून चाललेली. हिरव्या रंगाची छत्री होती. (अजून आठवण ताजी आहे. )मला पाहताच ती माझ्याजवळ आली आणि मला म्हणाली चल. मला कससंच वाटलं. मी आढेवेढे घेतले तेंव्हा ती मस्त अगदी लहान बाळासारखी हसली. नेहमीसारख्याच मस्त खळया तेंव्हाही तिच्या गालावर पडल्या. म्हणाली चल, किती वेळ आणखी उभा राहणार ? मनात म्हटलं हीचंपण बरोबर आहे. आम्ही सोबत चालू लागलो. मुसळधार पाऊस एका छत्रीत ती आणि मी मला खूप अवघडल्यासारखं

वाटत होतं. कुणी पाहिलं तर काय म्हणेल, पोरं चिडवतील अशा अनेक विचारांनी भीतीमुळे मनात गर्दी केली होती. (पाऊस म्हणजे रोमँटिक वगैरे त्यावेळी ठाऊक नव्हतं).

स्वातंत्र्यदिन असला तरी मी सहसा खिशाला झेंडा लावायचो नाही. (देशप्रेम मनात असायला हवं असा माझा विचार आहे म्हणून)तिने मला विचारलं "खिशाला झेंडा नाही लावत का ?" (नक्की शब्द आठवत नाहीत भावना लक्षात घ्या)मी म्हणालो मला नाही आवडत". तरीही तिने ऐकलं नाही दुकानातून झेंडा घेतला आणि तो मी नको म्हणत असताना देखील खिशाच्यावर टाचणीने लावला. तेंव्हा टाचणी टोचली (बहुतेक मुद्दाम). आजही आठवण झाली तर ती कळ येतेच. माझ्या एव्हाना एक लक्षात आलं होतं मी घाबरलेल्या अवस्थेत तिच्यासोबत छत्रीतून चाललो होतो. पावसाचं निमित्त होतं आणि ती नेहमीपेक्षा जास्त जवळून चालत होती आणि ते ही बिनधास्त. त्यामुळे माझ्या मनाची आणखीच बिकट अवस्था झाली होती. शाळा जवळ येत होती. तितक्यातच पाऊस थांबला तसा मी तिच्यापासून लांबून चालायला लागलो आणि तेंव्हाही ती जवळून चालायचा प्रयत्न करत होती. शाळेत पोहोचलो एकदाचा आणि मग आयुष्यात हिच्यापासून किमान पाच फुटाच्या परिघात फिरकायचं नाही असं ठरवलं (आणि पाळलं देखील).

त्यानंतर ती सहसा दिसली नाही. निम्म्यातूनच शाळा सोडली बहुतेक तिने. मी कॉलेजला असताना काही वर्षांनी ती दिसली तेंव्हा हातात हिरवा चुडा, गळयात मंगळसूत्र कपाळावर कुंकू(टिकली देखील असू शकते)ल्यालेली. तिचं तिच्या घरच्यांनी कमी वयातच उरकलं होतं. तेंव्हाही ती तशीच हसून खेळून बोलली पण तिचे डोळे काहीतरी वेगळंच सांगू पाहात होते. मी ते वाचलं आणि त्यानंतरचा संवाद नजरेला नजर न देताच आटोपता घेतला.

वर्षभरानंतर पुन्हा ती भेटली. तेंव्हा त्याच्या विरुद्ध दिसत होती. चेहरा थोडासा काळवंडलेला कपाळ सुनं झालेलं हातात हिरव्या बांगड्या नाहीश्या झालेल्या आणि काहीश्या केविलवाण्या अवस्थेत मला तिच्याशी बोलावसं वाटलं नाही. कारण का कुणास ठाऊक मला ते योग्य वाटलं नाही. मी मान घालून औपचारिक विचारपूस केली आणि निघून गेलो. नंतर कळले तिच्या नवऱ्याला असाध्य झाला होता. त्यातच त्याचा मृत्यू झाला. ती पुन्हा काही वर्षांनी भेटली तेंव्हा पुन्हा मंगळसूत्र, बांगड्या, कुंकू आणि कडेवर एक गोंडस बाळ होतं तिच्या. तेंव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला मी फक्त पाहात राहिलो. काय बोलावं ते सुचलंच नाही. काय विचारावं कळलंच नाही. ती ही काही बोलली नाही पण रागाने पहात निघून गेली ती शेवटची भेट. गारवा या मराठी अल्बम मध्ये सौमित्र आधी विचारतात 'बघ माझी आठवण येते का ? पण त्यानंतरच्या गाण्यातच बहुदा त्याचं उत्तर देतात,

पाऊस दाटलेला

माझ्या घरावरी हा

दारास भास आता हळुवार पावलांचा

या आठवणी आल्यावर मनाची बऱ्याचदा अशी अवस्था होते...

लंकादहन करायला गेलेल्या हनुमंताची शेपटी पेटवून देण्याची आज्ञा लंकाधिपती रावणाने दिली तेंव्हा ज्या तऱ्हेने हनुमंताची शेपटी वाढत चालली होती. अगदी तशीच माझी ही कथा (तुम्ही म्हणता म्हणून लेख) भागागणिक वाढत होती. दरवेळी वाचकांनी विनंती केली तरच पुढे लिहीन असे मी शेवटी म्हणायचो आणि कित्येक जण पुढचा भाग लवकर लिहण्याची विनंती करायचे. त्यांची मागणी मला पूर्ण करणं भाग असायचे म्हणून मी पुढचा भाग लिहायचो. आता मात्र पुरे करायला हवं असा माझा विचार झाला. (आवरतं घ्या अशी आज्ञा आदरणीय व्यक्तींकडून आली). म्हणून हा आज अखेरचा भाग लिहत आहे. साठा उत्तराची कहाणी पाचा

उत्तरी सुफळ संपूर्ण असे आपल्या आटपाट नगराच्या (नागराज मंजुळेंच्या कंपनीचं नाव आटपाट आहे त्याचा इथे काही संबंध नाही) कहाणीच्या शेवटी यायचं तसं इथेही आपण समजू या.

मागच्या आठवड्यात मोबाईलवर 'श्यामची आई' हे पुस्तक असलेलं ईसाहित्यचं ऍप डाउनलोड केलं. मुळात वेळ अजिबात नसतो आणि जो मिळतो त्यात प्रवास करत असतो मी(आपल्यापैकी बरेच जण)त्या वेळेत हे पुस्तक वाचन सुरु असतं. त्यावरून मला काही आठवलं.

शाळेत असताना एकदा असंच माझ्या हाती श्यामची आई हे पुस्तक लागलं होतं. (शाळेच्या लायब्ररीचं नाही बरं का. हा विषय थोडा बाहेरचा आहे. )मी ही त्याचं कव्हर पाहून घेतलं पटकन वाचायला. जो कोणी ते वाचत होता त्याने त्याच्या आतमध्ये चक्क नको ते पुस्तक ठेवलं होतं. म्हणजे वरून कीर्तन आतून तमाशा असा प्रकार तो इतकं मन लावून आत काय वाचत होता ते कळलं. मी ते जसं घेतलं तसंच ठेवलं. नंतर कळलं जी खूपच अभ्यासू मेहनती मुलं फलाट क्रमांक तीनवर, रेल्वेच्या पुलावर संध्याकाळी दिवे लागल्यानंतर अभ्यास करत असतात. त्यापैकी बरीच पुस्तकाच्या आत भलतंच पुस्तक ठेवून अभ्यास करत असतात त्यामुळे परीक्षेत दिवे लावतात. आधी मलाही थोर राष्ट्रपुरुषांसारखा आदर त्यांच्याबद्दल असायचा. परिस्थितीशी दोन हात करून ही मुलं इथे रात्र रात्र अभ्यास करतात याचं कौतुक वाटायचं. वाटायचं आपण ही इथेच अभ्यास करायला हवा यांच्यासोबत असंही काहीदा वाटायचं पण जेंव्हा सत्य परिस्थिती ज्ञात झाली तेंव्हा तिथून जाताना येताना देखील कससंच वाटायचं असो.

बरंच काही आहे हो या मनात असं साठलेलं तिच्याविषयी सांगण्यासारखं पण वेळ खूप कमी आहे आणि काम खूप जास्त तरी थोडक्यात. तर ती पुन्हा शाळेत आली होती आणि आमची अवस्था तशीच होती अगदी दादा कोंडकेंच्या गाण्यासारखी

ज्वानीची गाडी पुढं पळना

पिर्तीचं ठेसान तिला मिळना

अशीच होती. मग काय म्हटलं आपल्याला काही तिला विचारणं जमणार नाही असंच वाटू लागलं. पण काही गोष्टी कधी कशा जुळून येतील ते सांगू शकत नाही. शाहरुख चा डायलॉग आहे ना (जिसे तुम दिल से चाहो सारी कायनात तुम्हे उससे मिलाने मे लग जाती है). इथेही तसंच झालं एकदा शाळेतून घरी निघालो होतो. मला कल्पना नव्हती कि आपलं हे प्रकरण कुठवर पसरलंय ते. पार हाणामारी पर्यंत वेळ आली. त्यातही मला एका गोष्टीचा आनंद होता चला थोडा मार खाऊन का होईना दिल कि बात तिच्यापर्यंत पोहोचली. तिसऱ्या संचातल्या पोरांनी अशावेळी मला मदत केली आणि ते माझ्यासोबत माझ्या सुरक्षेसाठी उभे राहिले. नंतर सर्वकाही तणावमुक्त आणि तिच्या उत्तराची प्रतीक्षा. अशात वार्षिक परीक्षा संपली. आता मी तिचा विषय तेवढा गंभीरपणे घेत नव्हतो. कारण माझ्याकडून होकार होताच पण आता तिच्या उत्तराची प्रतीक्षा होती. एकदिवस मी माझ्याच वयाची माझ्या नात्यातली मुलं(त्यात माझ्या सहचारिणीचा भाऊ म्हणजे खरोखरीचा मेहुणा देखील होता. )घराकडून स्टेशनकडे येत होतो. आणि अचानक मला समोरून ती आणि तिच्यासोबत तिच्या सुरक्षेची जबाबदारी घेतलेली तिची मैत्रीण (मला मार पडण्यास कारणीभूत) येताना दिसल्या. शाळेच्या गणवेशाव्यतिरिक्त फुलाफुलांच्या कपड्यात ती अजून सुंदर दिसत होती. उन्हाळा होता तरीही तिला पाहिल्यावर अंगावर थंडगार शहारा आला. त्या दोघी समोरून येताना अशा दिसल्या जशी चौखूर घोडा उधळत येत असलेली राजकन्या आणि पाठोपाठ असलेल्या घोड्यावर तिच्या खास मर्जीतली अंगरक्षक दासी (हा चंद्रकांता इफेक्ट होता... त्यामुळे आपोआपच मी नवगडचा राजकुमार) असा भास मला होत होता. ती माझ्याचकडे पाहात हसत हसत येत होती आणि मलाही इतर काही दिसत

नव्हत. सागर पिक्चर मधलं गाणं (सागर जैसी आखोवली) आणि मैने प्यार किया मधलं ( आय लव्ह यु )मनातल्या मनात बॅकग्राउंड वाजत होतं. पोटात

खड्डा पडला होता. पुढच्याक्षणी काय होईल याची उत्कंठता लागली होती आणि मी एका जागी तिच्याकडे पाहात उभा होता. इतक्यात मला मागून कोणी हाक

मारली. मागे वळून पाहिलं माझ्या सोबत असलेली मंडळी मला हाक मारत होती. मला योग्यवेळी आवाज दिला आणि जागं केलं नाहीतर मेलोच असतो. या प्रकरणाबद्दल घरी काहीच कळलेलं नव्हतं पण आता सगळ्या नातेवाईकांत झालं असतं. मी शुद्धीवर आलो आणि तिला जवळ येण्यापासून रोखण्यासाठी तिच्याकडे रागाने पाहू लागलो(इच्छा नसताना खुन्नस दिली) माझ्या डोळयात राग पाहून ती होती तिथेच थबकली आणि तिच्या मैत्रिणीकडे पाहिलं. मी निघून गेलो आणि मनातून म्हणालो पुन्हा लवकरच भेट आपण खूप बोलूया. तिला ते बहुतेक ऐकूच गेलं नाही. ती तेंव्हा शेवटची दिसली होती. नंतर काही गुप्त सूत्रांकडून कळलं होतं ती माझी माफी मागायला आली होती आणि कदाचित होकार कळवायला देखील...

त्यानंतर मात्र मी सभ्य झालो अभ्यास एके अभ्यास मन ऐकत नव्हतं तरी त्याचा कान धरून पुस्तकात तोंड खुपसायला लावत होतो त्याला. विजयरथ (कोणत्याही वर्गात नापास न होता) दौडत होता. जसजशी शालांत परीक्षेची सीमारेखा जवळ येत गेली तसतसा त्याचा वेग मंदावला आणि नंबर घसरला असो. या सगळयात आलेलं शहाणपण किंवा आता आलेली वैचारिक परिपक्वता (अक्कल दाढ आल्यावर येते म्हणतात) यातून एक कळालं कि तुम्ही कोणावर प्रेम करताय यापेक्षा तुमच्यावर कोण प्रेम करताय ते शोधा त्यांना न्याय द्या. तुमचे माता पिता तुमच्यावर अफाट, अथांग आणि अखंड प्रेम करत असतात, भावंडं मित्र (आणि काही मैत्रिणीदेखील )प्रेम करतात माया लावतात त्यांना प्रेम द्या. फिल्मी प्रेमापेक्षा हे

वास्तव स्वीकारा. आणखी बरंच काही आहे शाळेतल्या अनुभवांबद्दल आठवणींनबद्दल पण पुन्हा केंव्हा तरी.



आमचे प्रिय कलाशिक्षक, हरहुन्नरी, उत्साही व्यक्तिमत्व दिवंगत श्री. रामचंद्र पागे सर यांच्या पवित्र स्मृतीस अर्पण (मी बसलेला उजवीकडे).

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान